*अत्यंत महत्वाचे*
शिबीर

जा.क्र.शिउसं/प्रशि-४/सूचनापत्र /पुवि/११-१२/ 1359
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक- 30 APR 2012

प्रति,

संस्था सचिव/अध्यक्ष
सर्व अनु./विनाअनु/ कायम विनाअनु अध्यापक विद्यालये,
पुणे विभाग.

अध्यापक विदयालयांसाठी परिपत्रक - अंतिम शिबीर

विषय - अध्यापक विद्यालयाचे सन ११-१२ वैयक्तिक मान्यता / सेवक संच-११-१२ / रोष्टर तपासणी- एका पेक्षा जास्त अध्यापक विदयालये कार्यरत असल्यास सर्व अध्यापक विदयालयांचे एकत्रित रोष्टर रजिष्टर तपासणी

उपरोकत विषयांस अनुसरुन कळविण्यात येते की ज्या अध्यापक विदयालयांनी सन ११-१२ चे सेवक संच अदयापी करुन घेतले नसल्यास अशा अध्यापक विदयालयांनी पुढील नमूद दिनांकांस आपले प्रस्ताव समक्ष तपासणी करुन घेण्यात यावेत.

तसेच एका संस्थेचे एका पेक्षा जास्त अध्यापक विदयालये कार्यरत असतील तर संस्थेचे सर्व अध्यापक विदयालयाचे एकत्रित रोष्टर रजिस्टर तयार करुन ते प्रशिक्षण ४ शाखेकडून तपासणी करुन घेण्यात यावेत. त्या खेरीज अशा अध्यापक विदयालयांचे वैयक्तिक मान्यता प्रस्ताव तपासले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ज्या अध्यापक विदयालयांनी सन २०११-१२ चे वैयक्तिक मान्यता प्रस्ताव अदयापी कार्यालयास सादर करुन तपासून घेतले नसल्यास अशा अध्यापक विदयालयांनी प्रशिक्षण ४ शाखेत पुढील नमूद दिनांकास प्रस्ताव सादर करावेत.

यानतर सेवक संच / रोष्टर तपासणी / वैयक्तिक मान्यता प्रस्ताव सन २०११-१२ चे प्रस्ताव कोणत्याही सबबी वर स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदरची माहिती आपले नजीकचे अध्यापक विदयालयानाही दूरध्वनी वरुन संपर्क करुन सांगून या कार्यालयास सहकार्य करावे.

| अ.क्र | जिल्हा | विषय | दिनांक | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे / नगर/ सोलापूर | सेवक संच सन ११-१२ सराव पाठशाळा सह | २/५/ २०१२ | प्रस्तुत कार्यालय |
| २. | पुणे / नगर/ सोलापूर | रोष्टर तपासणी-११-१२ | दि.३/५/१२ व दि४/५/१२ | प्रस्तुत कार्यालय |
| ३. | पुणे | वैयक्तिक मान्यता सन ११-१२ | दि. ८/५/१२ | प्रस्तुत कार्यालय |
| ४. | नगर | वैयक्तिक मान्यता सन ११-१२ | दि.९/५/१२ | प्रस्तुत कार्यालय |
| ५. | सोलापूर | वैयक्तिक मान्यता सन ११-१२ | दि. १०/५/१२ | प्रस्तुत कार्यालय |

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे १.